# रयत शिक्षण संस्था, सातारा
# वार्षिक अहवाल छपाई निविदा

रयत शिक्षण संस्था, सातारा सन 2018-19 सालासाठी वार्षिक अहवाल छपाईकरिता निविदा मागवित आहे. त्याचा तपशील संस्थेच्या **www.rayatshikshan.edu** संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन निविदा फॉर्म घेऊन इच्छूकांनी दि.06/02/2019 सायं.5-00 वाजेपर्यंत रोख रु. 500/- भरुन निविदा सादर करावी.

सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा

दिनांक

**प्रति,**

**मा.सचिव,**

**रयत शिक्षण संस्था,**

**सातारा.**

**यांना,**

**विषय- <u>वार्षिक अहवाल छपाईबाबत.</u>**

महाशय,

मी सन 2018-19 करिता वार्षिक अहवाल छपाईबाबतच्या निविदेमधील सर्व अटी व नियम वाचलेले असून ते मला मान्य आहेत. सदर अटी व नियमानुसार मी अहवाल छपाईबाबतचे काम वेळेत करण्यास तयार आहे. तरी कृपया माझी निविदा स्विकारावी, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

सही व शिक्का

# रयत शिक्षण संस्था,सातारा
# अहवाल छपाई निविदा सन 2018-19

## नियम व अटी

**अ. छापखान्यासंबधी**

1. निविदा भरणा-याचा स्वत:चा छापखाना,डी.टी.पी.युनिट,सी.टी.पी.युनिट व परफेक्ट बाईंडिंग युनिट इ. अनुषंगिक बाबी असणे आवश्यक आहे.
2. संस्थेने ठरवून दिलेल्या तारखेस अहवाल संस्था ऑफिसमध्ये पोहोच करणे आवश्यक आहे.
3. मजुरीचे दर सर्व करासहीत ( उदा.जी.एस.टी. व इतर सर्व ) असणे आवश्यक आहे.

**ब. वार्षिक अहवाल छपाई**

4. निविदा खाली निर्देशित केल्याप्रमाणे दोन स्वतंत्र Bid मध्ये भरावयाची आहे.

   **अ) Technical Bid** मध्ये खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

   1. बयाणा रकमेबाबत (EMD) सचिव,रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे नावाचा रू.10,000/- चा डिमांड ड्राफ्ट.
   2. इन्कमटॅक्स् क्लिअरन्स सर्टिफिकेट / इन्कम टॅक्स रिटर्न.
   3. व्यवसायकर नोंदणी पत्र.
   4. लघुउद्योग नोंदणी प्रमाणपत्र.
   5. छापखान्याची असणा-या जागेची,मशिनरीची, कामगारांची व वहातूक साधनांची माहिती.
   6. निविदा फॉर्ममधील सर्व अटी मान्य असलेबाबतचे संमतीपत्रक.

   **ब) Financial Bid** या लखोटयात योग्यरित्या भरलेला निविदा फॉर्म सोबत दिलेल्या नमुन्यातच दर द्यावा.

   वरील दोन्हीही लखोटे स्वतंत्र लखोटा नं 3 मध्ये घालावेत. लखोट्यावर संपर्काकरिता मोबाईल नंबर, इ-मेल आय.डी. असणे आवश्यक आहे.

5. टेंडर कालावधी 10 एप्रिल 2019 अखेर राहील.

पान नं. 2 वर..

6. संस्थेमार्फत कागद पुरवठा केला जाईल.

7. संस्थेमार्फत पुरविलेला कागद सुरक्षित ठेवणे व त्याच कागदाचा वापर करून अहवाल तयार करणे.

8. संपूर्ण अहवालाची चार रंगात छपाई करावयाची आहे. यामध्ये डी.टी.पी., पेज ले आऊट व तीन प्रुफे देणे या बाबींचा समावेश आहे. तसेच फोटो छपाई ही सुस्पष्ट असणे आवश्यक आहे.

9. अहवालाची पृष्ठे अंदाजे 204+4 पेजेसची छपाई करावी लागेल. यामध्ये मॅटर पेजेस, फोटो पेजेस व ग्राफ्स पेजेसचा समावेश राहील. कव्हरचे डिझाईन संस्थेकडून दिले जाईल. अहवालाच्या आतील पानांच्या संख्येत बदल झाल्यास मजुरीच्या दरात वाढ अथवा घट होऊ शकेल. व मंजूरीच्या दराप्रमाणेच मजुरी आदा केली जाईल. **वाढीव चार पानांचा दर अथवा कमी झालेल्या चार पानांचा दर स्वतंत्र द्यावा.**

10. कव्हरला मॅट व स्पॉट लॅमिनेशन संस्थेच्या सूचनेनुसार करावयाचे आहे.

11. झालेल्या कामाचा अहवाल फोन करुन ज्या त्या दिवशी कळविला पाहिजे.

**क. संस्था अटी**

12. टेंडर मंजूर झाल्यानंतर रुपये 10,000/- ( रु. दहा हजार फक्त. ) चा डिमांड ड्राफ्ट सुरक्षा अनामत म्हणून भरावे लागेल. डी.डी. **सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा** यांचे नावाने काढावा.

13. टेंडर मंजूर झाल्यानंतर संस्थेव्दारे देण्यात येणा-या कागदाच्या किंमतीची बँक गॅरंटी अथवा सदर कागदाच्या किंमतीचा चेक द्यावा लागेल.(अंदाजे रु. एक लाख पन्नास हजार)

14. अहवाल पॅकिंगसह पोहोच करण्याची जी अंतिम तारीख आपणास कळविली जाईल त्या तारखेनंतर अहवालाचा पुरवठा झाल्यास मजुरीच्या 5% एवढी दंड रक्कम आपल्याकडून वसूल केली जाईल. हा कालावधी 8 दिवस ग्राह्य धरला जाईल.

पा.नं. 3 वर..

जर छपाई करण्यास आपण असमर्थता दर्शवली तर संस्था इतर छापखान्यातून छपाई काम पूर्ण करून घेईल व सदर बिलाची रक्कम आपल्याकडून वसूल करण्यात येईल. तसेच आपली बयाणा रक्कम परत केली जाणार नाही व आपणास दोन वर्षासाठी काळ्या यादीत (Black List) घातले जाईल.

15. दोन टक्के कागद वर्तावळा म्हणून दिला जाईल. हा वर्तावळा नियोजित वेळेत काम न केल्यास ग्राह्य धरला जाणार नाही.
16. मजुरीचे देयक संस्थेकडे सादर झाल्यानंतर पंधरा दिवसांत 80 टक्के रक्कम व उर्वरीत 20 टक्के रक्कम 30 दिवसात दिली जाईल. तसेच मजुरीच्या देयकावर संस्थेचा जी.एस.टी. नंबर 27AAATT1566E1ZJ टाकणे आवश्यक आहे.
17. टेंडर कालावधी संपल्यानंतर टेंडर डिपॉझिट व बँक गॅरंटी अथवा चेक परत दिला जाईल.
18. मजूरीच्या देय रकमेतून शासकिय नियमानुसार इन्कम टॅक्स कपात केला जाईल.
19. नामंजूर दर पत्रकाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
20. निविदा मंजूर झाल्यानंतर दोन दिवसांत रक्कम रुपये 200/- च्या स्टॅम्पपेपरवर करारानामा करुन द्यावा लागेल.
21. सशर्त अथवा अपूर्ण टेंडर स्विकारले जाणार नाही. तसेच टेंडर ओपनिंगची तारीख,वेळ,ठिकाण आपणास फोन,इ-मेलव्दारे कळविली जाईल. यावेळेस आपण उपस्थित राहू शकला नाही तर संस्थेने घेतलेला निर्णय आपणावर बंधनकारक राहील.
22. निविदेच्या अनुषंगाने कोणताही वाद निर्माण झाल्यास इंडियन आरबिट्रेशन ॲक्ट 1940 मधील तरतुदीप्रमाणे संस्था कार्यवाही करेल व आरबिट्रेटरचा निर्णय अंतिम राहील.
23. वरील नियम व अटीमध्ये बदल व टेंडर पूर्णत: किंवा अंशत: मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार मा. सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी स्वत:कडे राखून ठेवलेले आहेत.

# रयत शिक्षण संस्था,सातारा

## वार्षिक अहवाल छपाई निविदा फॉर्म

## सन 2018-19

| अ.नं. | अहवाल तपशील | कव्हरसह पेजेस संख्या | मजुरीचे दर एका प्रतीस | वाढीव चार पेजेसचा दर एका प्रतीस | कमी चार पेजेसचा दर एका प्रतीस |
|---|---|---|---|---|---|
| 1 | साईज :- 1/4 डेमी<br>संख्या -2000 प्रती<br>डी.टी.पी. -कोरल ड्रॉमध्ये व फोटो शॉपमध्ये<br>प्लेटस - सी.टी.पी<br>छपाई - चार कलर मशीनवर<br>बाईंडिंग - परफेक्ट<br>लॅमिनेशन - मॅट व स्पॉट | अंदाजे 208 | | | |

( सही व शिक्का )